महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट-ब (प्रशासन शाखा)
<u>मधील अधिकाऱ्यांच्या सर्वसाधारण</u>
<u>बदल्यामधील अंशत: बदल -</u>
अधिक्षक व तत्सम पदे

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन आदेश क्रमांक : बदली ३११८/प्र.क्र.८६/प्रशा-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : २४ मे, २०१८

<u>वाचा</u>:-१) शा.शि.व क्री.वि., शासन निर्णय क्र.ईएसटी-३९१७/प्र.क्र.४६/प्रशा-२, दिनांक १७.०३.२०१७
२) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०१७/प्र.क्र.४१५/कार्यासन-१२, दिनांक ४.०९.२०१८
३) शा.शि.व क्री.वि., शासन निर्णय क्र.बदली-३११८/प्र.क्र.१४/प्रशा-२, दिनांक १६.०४.२०१८ तसेच शासन शुध्दीपत्रक समक्रमांक, दिनांक २०.०४.२०१८ व दिनांक २५.०४.२०१८
४) शा.शि.व क्री.वि., शासन आदेश क्र.बदली-३११८/प्र.क्र.८६/प्रशा-२, दिनांक १८.०५.२०१८

शासन आदेश-

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियम आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार दिनांक ३१ मे, २०१८ रोजी तीन वर्षाचा कालावधी पूर्ण करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या बदलीचे आदेश दिनांक १८ मे, २०१८ रोजी निर्गमित करण्यात आले आहेत. त्यामध्ये काही अधिकाऱ्यांच्या पदस्थापनेत अंशत: बदल करण्याचा निर्णय शासन स्तरावर घेण्यात आला आहे. सक्षम प्राधिकाऱ्यांची पूर्व मान्यता घेवून खालील तक्त्यात नमूद अधिकाऱ्यांची त्यांच्या नावासमोर स्तंभ क्रमांक-४ मध्ये दर्शविलेल्या पदावर सुधारीत पदस्थापना करण्यात येत आहे.

अ.क्र.	नाव व पदनाम	दिनांक १८.५.२०१८ अन्वये करण्यात आलेली पदस्थापना	सुधारीत पदस्थापना	अभिप्राय
१	२	३	४	५
१	श्रीमती किशोरी शरद करमुसे (जवळकर), अधीक्षक, वे. व भ. नि. नि. पथक, (प्राथ.), जि. प. सांगली	कनिष्ठ प्रशासन अधिकारी, विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, लातूर	अधीक्षक, वे. व भ. नि. नि. पथक, (प्राथ.), जि. प. कोल्हापूर	रिक्त पदावर

अ.क्र.	नाव व पदनाम	दिनांक १८.५.२०१८ अन्वये करण्यात आलेली पदस्थापना	सुधारीत पदस्थापना	अभिप्राय
२.	श्री. उत्तम मुरलीधर खरात, अधीक्षक, वे. व भ. नि. नि. पथक, (प्राथ.), जि.प. रत्नागिरी	अधीक्षक, वेतन व भ. नि. नि. पथक (माध्यमिक), जि. प. गडचिरोली.	कनिष्ठ प्रशासन अधिकारी, विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, लातूर	रिक्त पदावर

२. सदर अधिकाऱ्यांनी त्यांच्या नवीन पदाचा पदभार त्वरित स्विकारावा तसेच त्यांनी अनधिकृत रजेवर जाऊ नये. त्यांचे लक्ष सामान्य प्रशासन विभागाच्या क्रमांक-सीडीआर १०८२/२५६७/२८/अकरा दिनांक ३० ऑगस्ट १९९२ च्या परिपत्रकाकडे वेधण्यात येत आहे. त्यात दिलेल्या सूचना लक्षात घेऊन बदली रद्द करण्यासाठी कुठल्याही स्वरुपाची आवेदने सादर केल्यास, ते शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र ठरतील याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

३. आयुक्त (शिक्षण) पुणे यांनी या आदेशाप्रमाणे सदर अधिकाऱ्यांना त्यांच्या सध्याच्या पदभारातून तात्काळ कार्यमुक्त करण्याबाबत संबंधित नियंत्रण अधिकाऱ्यांना तातडीने कळवावे व बदली झालेले अधिकारी विहित कालावधीत दिलेल्या पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू होतील, याची खातरजमा करावी व याबाबतचा अहवाल शासनास सादर करावा.

४. या आदेशाची प्रभावी अंमलबजावणी होण्याकरीता बदली झालेल्या अधिकाऱ्यांचे वेतन कोणत्याही परिस्थितीत दिनांक १ जुलै, २०१८ पासून बदलीपूर्व कार्यालयाने आहरित करु नये.

५. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०५२४१८३७५९८६२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Ravindra Pralhad Ate

Digitally signed by Ravindra Pralhad Ate
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sport Departrment, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=fd5fc4fce5f6732e6657dca817ae6ee619a55d170d3c93eff53c3ca69d1a772d, serialNumber=eaa37af2edb5809b000f33d26328f6cdac80ee32afdac3f68b5821d14e41dffa, cn=Ravindra Pralhad Ate
Date: 2018.05.24 18:36:40 +05'30'

(र. प्र. आटे)

सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) आयुक्त, शिक्षण आयुक्तालय (मध्यवर्ती इमारत),महाराष्ट्र राज्य, पुणे
२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सांगली/ रत्नागिरी/कोल्हापूर/गडचिरोली
३) सर्व शिक्षण संचालक
४) विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे/कोल्हापूर/लातूर/नागपूर

५) संबंधित शिक्षणाधिकारी
६) संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी
७) संबंधित अधिकारी (आयुक्त (शिक्षण) यांचे कार्यालयामार्फत)

प्रत माहितीसाठी,

१) मा.मंत्री, शालेय शिक्षण यांचे विशेष कार्य अधिकारी.
२) प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे स्वीय सहायक
३) निवडनस्ती, प्रशा-२.